UGC Approved Journal No. 45886
Impact Factor: 4.321 (IIJIF)

# SECTION 'E'

330



Scanned with CamScanner

# 127.

# स्त्री चळवळीच्या पाऊलखूणा

**प्रा. मेघराज रा. शिंदे**
सिंधुताई जाधव कला व विज्ञान
महाविद्यालय. मेहकर
मो. न.९८९०१९३३१५

२०१२ मध्ये दिल्लीतील घटनेने जो काही कल्लोळ उठला आणि त्यातून एकूण भारतात सर्व ठिकाणी स्त्रियांवरील विशिष्ट हिंसाचार, विशेषतः बलात्कार या प्रश्नाला ज्याप्रकारे वाचा फुटली ती पाहता मनात अनेक गुंतागुंतीचे विचार येऊ लागले आणि मग कल्पना निघाली की, मराठीतून जी स्त्रियांची आत्मकथने /स्वकथने १९८० च्या दशकापासून जोरकसपणे आली, त्यातून स्त्रिया या शब्दाचा अर्थ  एकीकडे फोल ठरत होता, तर परिवर्तनाची एक वेगळी वाट दिसू शकेल असेही तेव्हा वाटले होते. म्हणूनच असंख्य लोकानी एकत्र रस्त्यावर येऊन हिंसाचाराच्या सर्व तऱ्हेच्या अविष्कारांनी खचून न जाता दुःखातून वर येऊन, रस्त्यावर नृत्य करून सोहळे करावे आणि हिंसाचाराचा अंत झाला पाहिजे अशी मागणी करावी, हा कार्यक्रम माध्यमांनी उचलून धरला आहे. एवढेच नव्हे, तर राजकीय दूतावास आणि युनायटेड नेशन्सचे सचिव कार्यालयसुध्दा याला पाठिंबा देत आहे. अशा वातावरणात हिंसाचाराविरुध्द बोलणे महत्वाचे वाटले तरी, पुरेसे वाटत नाही कारण, त्यामागील कार्यक्रमपत्रिका जागतिक पातळीवरील असल्याने प्रत्येक समाजाच्या भूमीवर चाललेल्या संघर्षांना त्यात विरघळवून टाकले जाईल की काय असे वाटते. जेव्हा हीच असंख्य लोक हिंसाचाराविरुध्द स्थानिक पातळीवर उभी राहतील तेव्हा, तेथे काहींना भांडवलाचा हिंसाचार दिसेल तर काहींना राज्यसंस्थेचा आणि त्यातून सर्वांनाच जोडलेले हिंसाचार लक्षात येऊन नवे परिवर्तन घडेल.

भारतामध्ये १९७० साली स्त्री-अभ्यासक ही ज्ञानशाखा उच्च शिक्षणामध्ये हस्तक्षेप करून प्रस्थापित झाली. १९८० नंतरच्या काळात स्त्री-अभ्यासविषयक विश्लेषणात्मक लिखाण होऊ लागले. स्त्री-शिक्षण ते स्त्री-अभ्यास असा प्रवास ऐतिहासिक वारसा या दृष्टीने तपासला गेला. खरोखर यापूर्वीच महाराष्ट्रात  जोतिबा- सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, धोंडो केशव कर्वे तर विसाव्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदु कोड बिल मांडून स्त्री प्रश्नाच्या सोडवणुकीचा जाहीरनामा मांडला. अशा मंडळींना शिक्षणामुळे स्त्रियांच्या अवनत परिस्थितीला छेद बसेल आणि त्यांना न्याय मिळेल अशी भूमिका मांडली.

स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री-प्रश्नासंदर्भातील परिप्रेक्ष्यामध्ये बदल झाला आणि उच्च शिक्षणामध्ये स्त्री-अभ्यास नावाच्या ज्ञानशाखेचा जन्म झाला. क्रमाक्रमाने गरीब, अशिक्षित, परिघाबाहेर ठेवल्या गेलेल्या बहुसंख्य स्त्रियांची दखल घेतली जाऊ लागली. स्त्री-अभ्यास हे परिवर्तनाचे चिकित्सक साधन होऊ शकते हा मुद्दा  १९८० च्या दशकात महत्त्वपूर्ण ठरला. एकोणिसाव्या शतकातील पंडिता रमाबाई, आनंदीबाई जोशी, रखमा राणी इ. झगडणाऱ्या स्त्रियांच्या जीवनावर प्रकाश टाकला गेला.

१९७५ साली मात्र ठाकरसी महिला विद्यापीठातील डॉ. स. गं. मालशे यांनी रद्दीतून शोधून काढून ताराबाई शिंदे यांचे स्त्री-पुरुष तुलना हे १८८२ चे पुस्तक प्रसिध्द केले.  मराठीतील स्त्री-अभ्यासासाठी एक अत्यंत मौलिक संहिता यामुळे अनेक देशी-परदेशी अभ्यासकांना उपलब्ध झाली. १९७८ साली प्रसिध्द झालेली विधवा विवाह चळवळ (१८०० ते १९००) हे पुस्तक पुन्हा एकदा स्त्री-अभ्यासाच्या दृष्टीने महत्वाचे आणि पायाभूत ठरले. १९८० च्या दशकात भारतीय अर्थ विज्ञान वर्धिनीने मी बाई आहे म्हणून हे पुस्तक प्रसिध्द केले. याच वर्षी छाया दातारांचे स्त्री-पुरुष नावाचे महत्वाचे पुस्तक प्रसिध्द केले.स्त्री-अभ्यासाच्या दृष्टी स्त्रियांचे अनघड थेट अनुभव तसेच त्यांचा मौखिक इतिहास सांगणारी कथने किती पायाभूत आहेत हेही सिध्द झाले.

१९८९ साली मौखिक इतिहासाचा प्रत्यक्ष आविष्कार करणारे आणि आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांचा सहभाग कसा होता हे सांगणारे आम्हीही इतिहास घडवला हे पुस्तक उर्मिला पवार आणि मीनाक्षी मून यांच्या संपादनाखाली प्रसिध्द झाले. भारतातील स्त्रिया जातीच्या, धर्माच्या, अर्थव्यवस्थेच्या कोंडीत जगत असल्या तरी सामाजिक चळवळीच्या अवकाशात त्या सार्वजनिक जीवनात कृतीशील सहभाग घेत होत्या, त्या परिवर्तनाच्या वाहक होत्या. हे या पुस्तकातून स्पष्ट झाले.

१९७३ साली भारतातील पहिले स्त्री-अभ्यास केंद्र मुंबईतील एस.एन.डी.टी. विद्यापीठात प्रस्थापित झाले.

१९७४ ते १९८१ या काळात या केंद्राने मराठीपुरती  स्त्री-मुक्तीच्या  पाऊलखुणा नावाचा प्रकल्प टाटा समाजविज्ञान संस्थेच्या अंतर्गत असलेल्या स्त्री-अभ्यास केंद्राने हाती घेतला आणि त्या माध्यमातून महत्वाची पाच पुस्तके प्रसिध्द केली.

330



Scanned with CamScanner

१९९० च्या दशकात स्त्री-अभ्यासाची कक्षा स्त्रियांनी, स्त्रियांसाठी, स्त्री-प्रश्नावर केलेले अभ्यास अशा चौकटीत मर्यादित ठेवण्यातले धोके स्पष्ट होऊ लागले. स्त्री-अभ्यासाची व्याप्ती वाढविण्याची गरज विशेषतः १९९० नंतर जागतिकीकरण आणि मूलतत्ववादाच्या संदर्भात अधिक जाणवू लागली. या नव्या जाणिवेतून पुणे विद्यापीठातील सावित्रीबाई फुले यांचा वारसा सांगणाऱ्या स्त्री-अभ्यास केंद्राने वाचनसाहित्य निर्माण केले. त्यातच स्त्री-अभ्यासासाठी विविध कुटुंबांचे सामाजिक अंगाने लिहिलेले इतिहास किती आवश्यक आहेत हे जाणवून १९९७ साली ख्रिस्ती सामाजिक संघटनांचे लिंगभावविषयक दृष्टिकोण तपासणारा निबंध प्रसिध्द केला. स्त्रीवादी परिप्रेक्ष्य भारतीय संदर्भात अब्राम्हणी चौकटीत विकसित करता येते का याचा शोध घेणाऱ्या निबंधांचे संकलनही १९९८ साली प्रसिध्द झाले.

१९९० च्या दशकाच्या अंतिम टप्प्यावर भारतातील समकालीन चळीचे प्रश्न : स्त्रीवादी चर्चाविश्वाचा आढावा या नावाचे संकलन पुणे विद्यापीठाच्या स्त्री-अभ्यास विभागाने सुगावा प्रकाशनाने प्रसिध्द केले. थोडक्यात, स्त्री-अभ्यासाला एकाच वेळी स्वायत्तता आणि जोडलेपणा स्वीकारुन संकुचित अस्मितेच्या चौकटीतून स्वतःची सुटका करुन घेणे भाग पडले. तसेच भारतातील आणि महाराष्ट्रातील स्त्री चळवळीलाही हे भान ठेवावेच लागले. हेच भान स्त्रियांच्या आत्म-स्वकथनातून दिसून येते

मलिका अमर शेख यांच्या मला उदध्वस्त व्हायचंय या काळाच्या पडद्याआड गेलेल्या स्वकथनाने स्त्री प्रश्नाची सुरुवात केली आहे. नामदेव ढसाळ यांचे अतिशय थेट आणि धारदार नेतृत्व मलिका अमर शेख यांना कसे दिसले. दलित पँथर ने संकुचित ब्राहणी हिंदुत्वाला कसे हेलपटवले आणि त्याच वेळी कम्युनिस्ट विचारसरणी विषयी कशी घृणा निर्माण केली गेली होती आणि राजा ढाले आणि नामदेव ढसाळ या दोन सर्जनशील माणसांनी एकमेकांना कसे संपवले हे सगळे यात आहे. हे आत्मकथन नेहमीच महत्वाचे वाटते आणि त्यातही नामदेव, मलिका ह्यांचे एकमेकांना जपणे, सांभाळणे आणि मलिकांचे नामदेव यांच्यावर विश्वासून स्वस्थ होणे हे सुध्दा महत्वाचे वाटते.

यानंतरचा १९७० साली प्रसिध्द झालेल्या सांगत्ये ऐका हंसा वाडकर यांचे आत्मकथन महत्वाचे आहे. हंसा वाडकर नाटक, सिनेमांमध्ये रमल्या होत्या परंतु त्यातून त्या व्यसनातून बाहेर पडण्याचा त्यांचा प्रयत्न आणि आर्थिक समतोल साधण्याचा प्रयत्न सांगत्ये ऐका मध्ये बरेच काही शिकवून जातो. विशेषतः हंसा वाडकर नाचणार नाहीत, गाणार आहेत यावर झालेला गलबलाट यासंबंधीचा मजकूर वाचला की, एकाच वेळी कलावंत म्हणून जगताना, मुलाबाळावर प्रेम करण्याची इच्छा ठेवणे आणि बदनामीमधून जुने आयुष्य झुगारण्याचा प्रयत्न महत्वाचा वाटतो.

लीला आवटे यांच्या मी घडले अशी या स्वकथनातील मजकूर असाच महत्वाचा आहे. बुध्दिवाद आणि अन्यायविरुध्द चीड ही दोन मूल्ये घेऊन १९३० ते १९५० या राजकीयदृष्टया भंतरलेल्या कालखंडात ज्या मुलींना स्नेहगट तयार करता आला, त्याचा एक भाग म्हणजे लीला आवटे, महात्मा गांधी, जवाहरलाल, सुभाषचंद्र हे ज्या काळाचे रोल मॉडेल होते, त्या काळात राष्ट्र सेवादलसुध्दा किती जोरकसपणे कार्यरत होते, हे या उताऱ्यातून समजते. समाजभान असलेली ही शिक्षिका आपल्या विवाहाकडे, कुटुंबाकडे किती जागरुकतेने पाहत होती हे वाचल्यावर जाणवते की, भक्तिकाळात तुकारामांना गुरु करणारी बहिणाबाई, आणि लीला आवटे यांचे एक नाते आहे असे वाटते.

या नंतर २००३ साली प्रसिध्द झालेले आणि गाजलले उर्मिला पवारांचे आयदान त्यातील एक लहानसा परिच्छेद महत्वाचा आहे एकीकडे पतीचे आजारपण वाढत जाणे आणि तरीही उर्मिला पवारांना किडन्या देऊन दुसऱ्याचा जीव वाचवावासा वाटतो, उगाच रडत बसायचे नाही हे सुत्र घेऊन जगलेल्या उर्मिलाताई कपाळाचा टिळा आणि पोटचा गोळा अशी दोन दुःखे सोसतात. आणि म्हणतात, मी माझ्या आयुष्याचं हे आयदान त्याची वीण वाचणाराला काय देणार आहे फार तर, त्याला त्याच्या जगण्याची आठवण करुन देईल किंवा एखाद्याला ते फेकून द्यावं असंही वाटेल पण इथल्या प्रत्येक व्यक्तीचं जगणं हे एक सामाजिक वास्तव आहे एखद्या दृष्टीनं माझ्याही जगण्याकडे त्यानं पाहावं अशी अपेक्षा आहे.

या नंतरचे २०१२ साली प्रसिध्द झालेले हिरा पवारांचे स्वकथन आताच्या काळाला भिडण्याच्या दृष्टीने महत्वाचे म्हणून आहे. साध्या वस्त्यांमधला पण भर्जरी माती ल्यायलेला कवी दया पवार यांच्या आणि हिराच्या कुटुंबाचे जमिनीवरचे दैनंदिन जगणे आणि त्यातील गुंतागुंत, आंतरविरोध आपण केवळ एक नमुना म्हणून येथे वाचणार आहोत. ध्येय आणि विचार घेऊन जगणारी ही माणसे बाळंतपणाचा सगळा ताण सोसत नोकरी करणे, आपली स्वतःची कमाई करणे आणि प्रतिष्ठेने जगणे असा समग्र ध्यास घेऊन आपल्या मुलाबाळांवर माया करुन नांदले.

□□□

330
Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana



Scanned with CamScanner